**प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे अतिरिक्त सतपास श्री. एस. आर. पोवार वकील.**

**१८.** आता मला फेरफार क्र. ४४८ चा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २६२** देण्यात येतो. आता मला गट क्र. १२२/क चा सातबारा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २६३** देण्यात येतो. आता मला गट क्र. १२२/क सन १९९९ ते २०१२ पर्यंतचा सातबारा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २६४** देण्यात येतो. आता मला गट क्र. १२२/ब सन १९८९-९० ते १९९८-९९ पर्यंतचा सातबारा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २६५** देण्यात येतो. आता मला गट क्र. १२२/ब सन १९९९ ते २०१२ पर्यंतचा सातबारा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २६६** देण्यात येतो. आता मला गट क्र. १२२/अ सन १९८९-९० ते १९९८-९९ पर्यंतचा सातबारा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २६७** देण्यात येतो. आता मला गट क्र. १२२/अ सन १९९९ ते २०१२ पर्यंतचा सातबारा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २६८** देण्यात येतो.

**१९.** आता मला गट क्र. ३० चा सन १९८९-९० ते १९९८-९९ पर्यंतचा सातबारा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २६९** देण्यात येतो. आता मला गट क्र. ३० चा सन १९९९ ते २०१२ पर्यंतचा सातबारा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २७०** देण्यात येतो. आता मला फेरफार क्र. ७५१ चा उतारा दाखविला, त्याला **नि. क्र. २७१** देण्यात येतो. आता मला आमच्या मधील नि. क्र. २५५ चा दस्त दाखविला, तो संजय महादेव पन्हाळकर यांच्या हस्ताक्षरात लिहिलेला आहे. त्यावरती माझी, वादी व प्रतिवादी क्र. १ आणि साक्षीदारांच्या स्वाक्ष-या असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलटतपास श्री. एस. एम. देशपांडे वकील यांचे मार्फत.**

**२०.** संजय पन्हाळकर याचे दहावी पर्यंतचे शिक्षण झालेले असून तो इंग्रजीमध्ये स्वाक्षरी करतो. त्याचा दस्तलेखनाचा व्यवसाय नाही. मी सांगितलेल्या नि. क्र. २५५ वरील वाटणीपत्र दस्तावरती संजय पन्हाळकर याने स्वाक्षरी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व त्याच्या पत्नीने कधीही नि. क्र. २५५ वरील वाटणीपत्रावरती स्वाक्षरी केलेली नाही. वादीच्या पत्नीचे दहावी पर्यंतचे शिक्षण झालेले आहे. मला ती स्वाक्षरी करु शकत नसल्याबाबत माहिती नाही.

**२१**. मी माझ्या वयाच्या १५ व्या वर्षापासून सन १९७५ पासून मुंबई येथे काम करत आहे. मी सध्या हॉटेल व्यवसाय करतो. मी चालवत असलेली दुर्गा सोसायटी सहकार कायद्या अंतर्गत नोंदणीकृत आहे. मी सध्या त्या संस्थेचा अध्यक्ष असून तिचे दरवर्षी ऑडिट होते. संस्था संचालकाला किंवा अध्यक्षाला संस्थेमार्फत कोणतेही मानधन दिले जात नाही. मला सदर संस्थेचा अध्यक्ष असल्याबाबत राज्य शासनाकडून कोणतेही मानधन मिळत नाही.

**२२**. मी आणि प्रतिवादी क्र. १ ने एकत्रीत लेखी कैफियत दिलेली नाही. मी या दाव्यात दाखल केलेली कैफियत तयार करताना वकिलांना माहिती दिलेली होती. मी दिलेल्या माहिती प्रमाणे माझ्या वकिलांनी कैफियत तयार केलेली असून मी ती वाचून पाहिल्यानंतर त्यावरती स्वाक्षरी केली आहे. मी लेखी कैफियत तयार करताना माझ्या वकिलांना आता माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र. १२ मधील अधोरेखांकित भाग अ आणि परिच्छेद क्र. १६ मधील अधोरेखांकित भाग ब सांगितले नव्हते. मला त्यावेळी सदर बाबी माहित नसल्यामुळे मी त्या सांगितल्या नव्हत्या.

**२३**. **प्रश्न** – तुम्हाला अधोरेखांकित भाग अ मधील माहिती केव्हा झाली ?
**उत्तर** – मला अगोदर पासून त्याबाबत माहिती आहे.

**२४**. मला सदर माहिती माझी लेखी कैफियत तयार करताना वकिलांना सांगण्यास कोणतीही अडचण नव्हती. मला मागील दोन वर्षापूर्वी अधोरेखांकित भाग ब मधील माहिती मिळालेली आहे. मला गट क्र. ४६२ मध्ये प्रतिवादी क्र. १ ने किती इंचाचा व खोलीचा बोअरवेल घेतला असून त्यास किती खर्च आलेला आहे याची मला माहिती नाही. मला प्रतिवादी क्र. १ ने कोणत्या वर्षी किती क्षेत्राची जमीन खर्च करुन लेवल केली याबाबत माहिती नाही.

**२५**. मी सांगत असलेल्या दि. ३०.०५.१९९० रोजीच्या वाटणीच्या वेळी आम्ही तीनही भाऊ व त्यांच्या पत्नी, बहिणी व आई हजर होतो.

**प्रश्न** – तुम्ही सांगत असलेल्या वाटणीपत्रावरती हजर असलेल्या आम्हा भावांच्या पत्नींसह आई आणि बहिणींच्या स्वाक्ष–या घेतल्या काय ?

**उत्तर** – वादी क्र. १ ची पत्नी मंगल शिवाय इतर कोणाचाही आक्षेप नसल्यामुळे आम्ही

त्यांच्या स्वाक्ष-या घेतल्या नाहीत.

**२६**. आमच्या बहिणींनी त्यांचा हक्क आमच्या हिस्याला सोडल्या बाबत कोणताही दस्त केलेला नाही. आम्ही दि. ३०.०५.१९९० रोजी वाटणी झालेल्या जमिनीमध्ये फिरुन मोजणी केली होती. आम्ही सकाळी ०८.०० वाजता घरी बोलणी चालू केल्यानंतर दुपारी १२.३० वाजता पंचांसह शेतामध्ये गेलो होतो. आम्ही शेतात गेल्यानंतर प्रतिवादी क्र. १ मोठा भाऊ असल्यामुळे त्याने सांगितलेल्या हद्दीप्रमाणे आम्ही दो-या टाकून मोजणी केली होती.

**२७**. माझ्या वाटणीला १०६ गुंठे क्षेत्राची आणि वादीच्या वाटणीला ५७ गुंठे क्षेत्राची जमीन आली होती. मला प्रतिवादी क्र. १ ला किती क्षेत्राची जमीन वाटून दिली होती याबाबत आठवत नाही. त्या वाटणीत प्रतिवादी क्र. १ ला २५ x १८ क्षेत्राची आणि वादीला खुल्या परडयासह २८ x २५ क्षेत्राची मिळकत दिली होती. वादीला १० x २५ घराची आणि परडयाची १३ x २५ अशी एकूण २८ x २५ जागा मिळाली होती.

**२८.** मी सांगत असलेल्या वाटणीमध्ये माझ्या शेतमिळकतीतील क्षेत्रा एवढेच क्षेत्र प्रतिवादी क्र. १ ला मिळाले होते. वादी पुर्वीपासून शेती करत असून त्याचे दहावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. वादीला दिलेली ०.५७ आर जमीन सुपीक व पाण्याखालची असल्यामुळे त्याला कमी क्षेत्र देण्यात आले होते. मागील दहा वर्षात हालेवाडी गावातील गट क्र. ४५४ ची जमीन गावठाण हद्दीलगत आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यातील कथित वाटणीच्या वेळी गट क्र. ४५४ ची जमीनीचे बाजारमूल्य जास्त होते.

**२९**. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्या प्रमाणे कधीही आम्ही भावा-बहिणींमध्ये दि. ३०.०५.१९९० रोजी कोणतीही वाटणी झालेली नाही. आम्हाला सदर वाटणी प्रमाणे सातबारा उता-याला नोंदी घेण्यासाठी कोणतीही अडचण नव्हती. दावा मिळकत गट क्र. ४५४ मधील ग्रामपंचायत मिळकत क्र. १२८ व १२९ या जागेमध्ये शेड असून मिळकत क्र. ७६ मध्ये दुमजली घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या घराच्या वरच्या मजल्यावरती बांधकाम झाल्यापासून वादी राहत आहे.

**३०**. मी इंग्रजी व मराठी दोन्ही भाषेमध्ये स्वाक्षरी करतो. मी दि. ०२.११.२०१६ रोजी सरपंच मंगल प्रकाश पाटील हालेवाडी, तंटामुक्ती अध्यक्ष हालेवाडी, पोलिस निरीक्षक

आजरा, जिल्हा पोलिस अधिक्षक कोल्हापूर आणि गृहविभाग महाराष्ट्र राज्य यांना पत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी ते पत्र वादीची गट क्र. ४५४ मधील घरात बेकायदेशीर वहिवाट असून त्याने ती कमी न केल्यास आत्मदहन करीत असल्याबाबतचा इशारा देण्यासाठी दिले होते. आता मला सरपंच मंगल पाटील यांना दिलेले ते पत्र दाखविले, त्यातील मजकूर बरोबर असून त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. सदर पत्र साक्षीदाराला उलट तपासा दरम्यान दाखविले असता त्याने मान्य केल्यामुळे त्याला **नि. क्र. २७४** देण्यात येतो.

**३१**. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४५४ मधील घर व शेड हे आमच्या एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकती मी स्वतःच्या उत्पन्नातून बांधल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत मिळकत क्र. ७६ ची फोड होण्यासाठी मी अर्ज दिल्यामुळे त्याची ७६/१ व ७६/२ अशी फोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार नोंद क्र. ४४८ वस्तूस्थितीला धरुन करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादी क्र. १ ने महसूल कर्मचा-यांना हाताशी धरुन खोटी फेरफार नोंद घेतली आहे.

**३२**. प्रतिवादी क्र. १ च्या नावे वडकशिवाले येथील गट क्र. ३५४ मधील खरेदी केलेली जमीन ही आमच्या एकत्रीत कुटुंबाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीचे आमच्यात वाटप होऊन स्वतंत्र ताबा असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गट क्र. १२२ ची जमीन वादीने प्रदिप कदम याला विकल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला त्याचा हिस्सा मिळू नये यासाठी सरतपासात खोटा मजकूर सांगून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - २०.०९.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.